# महाराष्ट्र शासन
## नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण

मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, नाशिक रोड, नाशिक - 422101
दुरध्वनी क्र. 0253-2461909 Email- kumbhmela.2027@mah.gov.in

जा.क्र.नात्रकुंप्रा/प्रा.बैठक / ०९ /२०२६/ दिनांक. स्वाक्षरी खाली नमूद आहे.

प्रति,

मा.जिल्हाधिकारी, नाशिक
मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक
मा.जिल्हाधिकारी, आहिल्यानगर
मा.महानगर आयुक्त, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक.
मा.पोलीस आयुक्त, नाशिक शहर.
मा.पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामीण.
मा.आयुक्त, महानगरपालिका, नाशिक.
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक.
मा.मुख्यधिकारी त्र्यंबक नगरपरिषद
मा.उपायुक्त (नियोजन ) नाशिक
मा.विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नाशिक
मा.उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक.
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, देवळाली कंन्टोंमेंट, नाशिक.
मा.अधिक्षक अभियंता (लाभक्षेत्र विकास), जलसंपदा विभाग, नाशिक.
मा.मुख्य अभियंता , सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक.
मा.मुख्य अभियंता , महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नाशिक.
मा.अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरण कं. मर्या., नाशिक शहर/ ग्रामीण.
मा.प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक.
मा.सह संचालक,लेखा व कोषागार विभाग, नाशिक
मा.सह संचालक,नगर रचना विभाग, नाशिक
मा.रेल्वे मंडळाचे प्रतिनिधी
मा.कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक.
मा.जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक.
मा.जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक.
मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, नाशिक
मा.सहायक संचालक, महाराष्ट्र राज्य पुरातत्व विभाग, नाशिक.
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, NMSCDCL

**विषय:** नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाच्या दिनांक ३१/१२/२०२५ रोजी मा. अध्यक्षतेखाली झालेल्या सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या बैठकीचे इतिवृत्त.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सिंहस्थ कुंभमेळा २०२७ कुंभमेळा प्राधिकरणाच्या दि ३१/१२/२०२५ मा. अध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

सदर बैठकीचे इतिवृत्त सोबत पाठविण्यात येत असून मा. अध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक महोदय यांचे सूचनेनुसार सदर इतिवृत्तात नमूद केल्याप्रमाणे आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करून त्याचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा, ही विनंती.

Digitally signed by
Yogendra Ashok Chaudhari
Date: 27-01-2026 20:09:00

(योगेंद्र चौधरी)
उपआयुक्त (नियोजन),
नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण,
नाशिक

**नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा दि.३१/१२/२०२५ रोजी झालेल्या कुंभमेळा प्राधिकरणाच्या बैठकीचे इतिवृत्त.**

दि.३१/१२/२०२५ रोजी डॉ.प्रविण गेडाम, अध्यक्ष, नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा व प्राधिकरणाची बैठक घेण्यात आली. बैठकीत उपस्थितांची यादी सोबत संलग्न आहे. कुंभमेळा आयुक्त तथा सदस्य सचिव यांनी सर्व प्राधिकरण सदस्यांचे स्वागत केले आणि बैठकीला सुरुवात झाली.

नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा आयुक्त यांनी दि.१३/१२/२०२५ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्ताला मान्यता देण्याबाबत सर्व प्राधिकरण सदस्यांना विनंती केली त्यानुसार प्राधिकरणाने घेतलेली दि.१३/१२/२०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्ताला सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.१:- त्र्यंबकेश्वर येथे नवीन प्रशासकीय इमारत बांधकामांना प्रशासकीय मंजुरी देणे..**

त्र्यंबकेश्वर येथील नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाच्या आवश्यकतेबाबत कुंभमेळा आयुक्त यांनी प्राधिकरणाला निदर्शनास आणून दिले. अधीक्षक अभियंता, सा.बा.विभाग यांनी इमारतीचा आराखडा तसेच इमारतीमध्ये समावेश असलेली कार्यालये, जागा व इतर अनुषंगीक माहिती दिली. त्र्यंबकेश्वर येथे नवीन इमारतीचे बांधकाम ऐतिहासिक वास्तु सारखे करण्यास प्राधान्य देण्यात यावे जेणे करुन त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या दर्शनपथाशी सुसंगत असेल तसेच त्या शेजारी बांधण्यात येत असलेल्या शासकीय इमारतीची उंची व रंगसंगती परस्पर पुरक करणेबाबत आणि इमारतीमध्ये पुरेसे वाहनतळ देखील राहील याची दक्षता घेण्यात यावी असे मा.अध्यक्ष महोदयांनी नमूद केले. सदर रु.४६.५७ कोटीचे कामास सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.२:- सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरण अंतर्गत रेल्वे स्थानक येथे पाणी पुरवठा विषयक कामांना प्रशासकीय मंजुरी देणेबाबत..**

ग्रा.पं.खेरवाडी ता.निफाड जि.नाशिक, ग्रा.पं.सुकेणे ता.निफाड जि.नाशिक, ग्रा.पं.ओढा ता.नाशिक जि.नाशिक देवळाली रेल्वे स्टेशन या ठिकाणी पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत करणेबाबत कार्यकारी अभियंता जि.प.नाशिक यांनी प्राधिकरणाच्या बैठकीस माहिती दिली. सदर प्रकल्पाअंतर्गत पाणी पुरवठा करण्यासाठीचा स्त्रोत उपलब्ध आहे किंवा कसे तसेच रेल्वे विभागाकडून सदर कामांबाबत निधी उपलब्ध होणार आहे किंवा कसे याबाबत मा.अध्यक्ष महोदयांनी चर्चा केली. पाणी पुरवठा करणेबाबतचे स्त्रोत जिल्हा परिषदेने निवडला आहे व सदर पाणी पुरवठा रेल्वे स्टेशन पावेतो करण्यात येणार आहे. रेल्वे स्टेशन अंतर्गत पाणी पुरवठा हा रेल्वे विभागाकडून करण्यात येणार आहे असे कार्यकारी अभियंता, जि.प. व रेल्वे प्रतिनिधीनी नमूद केले. तसेच देवळाली व इतर स्थानकासाठी नाशिक महानगरपालिकेकडून पाणी पुरवठा केला जातो असे आयुक्त, महानगरपालिका यांनी नमूद केले. सबब चारही ठिकाणांसाठी पाणी पुरवठा करण्यासाठी रु.७.४ कोटीचे कामांना सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.३:- सिंहस्थ कुंभमेळा २०२७-२०२८ करीता त्र्यंबकेश्वर नगरपरिषदेअंतर्गत भुसंपादीत व अधीग्रहीत जागांचे सर्व्हेक्षण व अनुषंगीक कामे करणे करिता सर्व्हेअर सल्लागार नेमणेबाबत प्रशासकीय मंजुरी देणे..**

त्र्यंबकेश्वर येथे २१९ एकर क्षेत्र भाडेतत्वावर अधिग्रहीत करण्यासाठी जमिनीचे सर्वेक्षण आणि अनुषंगीक कामे करण्यासाठी सल्लागार सर्वेक्षक नेमण्यासाठी आयुक्त, महानगरपालिका यांनी माहिती दिली. मुख्याधिकारी, त्र्यंबकेश्वर यांनी सदर काम आवश्यक असल्याबाबत नमूद केले तसेच सदर कामासाठी दर हे संयुक्तीक असलेबाबत कुंभमेळा आयुक्त महोदयांनी नमूद केले. कुंभमेळ्याच्या कामाची अत्यावश्यक निकड विचारात घेता, सदर रु.२.५८ कोटीचे कामास सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.४:— त्र्यंबकेश्वर नगरपरिषद हद्दीतील एकुण दहा आखाडे असलेल्या भागात रस्ते, टॉयलेट, बाथरुम, धर्मध्वज, वॉल कंपाउंड व अनुषंगीक कामांना प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत..**

त्र्यंबकेश्वर नगरपरिषद हद्दीतील एकुण दहा आखाडे (आखाडे अनुक्रमे-आवाहन, अटल, महानिर्वाणी, निरंजणी, अग्नी, निर्मल, जुना, आनंद, नया उदासिन,बडा उदासिन) असलेल्या भागात रस्ते, टॉयलेट, बाथरुम, धर्मध्वज, वॉल कंम्पाऊंड, किचन व अनुषंगीक कामे करणेबाबत मुख्याधिकारी, त्र्यंबकेश्वर नगरपरिषद यांनी माहिती दिली. सदर आखाडयांची कामे कोणत्या यंत्रणेमार्फत करण्यात येणार आहे असे मा.अध्यक्ष महोदयांनी विचारण केली असता सदर कामे त्र्यंबकेश्वर नगरपरिषदे मार्फत करण्यात येणार असल्याचे मुख्याधिकारी, त्र्यंबकेश्वर नगरपरिषद यांनी सांगितले. त्र्यंबकनगर परिषदेमार्फत आखाड्यांच्या मागणीनुसार कामे प्रस्तावित आहे. ज्यात प्रामुख्याने आखाड्यासाठी शौचालयाची व्यवस्था रस्त्यांची व्यवस्था तसेच धर्म ध्वज या कामांचा समावेश आहे. आवाहन आखाड्याच्या मागणीनुसार आखाड्याची कंपाउंड वॉल हे काम समाविष्ट आहे. असे देखील मुख्याधिकारी, त्र्यंबकेश्वर यांनी सांगितले. सदर रु.१० कोटीचे कामांना सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.५:- सिंहस्थ कुंभमेळा २०२७-२८ अनुषंगाने त्र्यंबकेश्वर परिसरातील विद्युत पुरवठा यंत्रणा बळकटीकरणाच्या कामांना प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत..**

विद्युत विभागाच्या कामांसाठी अधीक्षक अभियंता, म.रा.वि.वि.कं. यांनी सविस्तर माहिती प्राधिकरणाला दिली. सदर कामांमध्ये प्रामुख्याने नवीन ३३/११ के.व्ही. उपकेंद्र उभारणी व संबंधित विद्युत व्यवस्था मजबुतीकरणाबाबत कामांचा समावेश आहे असे अधीक्षक अभियंता, म.रा.वि.वि.कं. यांनी नमूद केले. अधीक्षक अभियंता, म.रा.वि.वि.कं. यांनी रु.३३.८९ कोटीचा प्रस्ताव हा आपत्ती व्यवस्थापन निधी अंतर्गत प्राधिकरणास सादर केलेला आहे. सदर प्रस्तावाला देखील मान्यता आवश्यक असल्याबाबत अधीक्षक अभियंता, म.रा.वि.वि.कं. व कुंभमेळा आयुक्त यांनी सांगितले. सदर प्रस्तावाची आवश्यकता पाहता कामांना आपत्ती व्यवस्थापन निधीअंतर्गत निधी उपलब्ध होण्याच्या अटीस अधिन राहून रु.३३.८९ कोटी रुपयांचा प्रस्तावासह रु.६०.५९ कोटीचे प्रस्तावांना प्राधिकरणांमार्फत मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.६:- नाशिक त्र्यंबकेश्वर येथे होणा-या कुंभमेळाचे अनुषंगाने शिर्डी नगरपंचायतीने सादर केलेले रस्ते व वाहनतळ करण्याचे कामांना प्रशासकीय मंजुरी देणेबाबत..**

कुंभमेळाचे अनुषंगाने शिर्डी नगरपंचायतीने सादर केलेले रस्ते व वाहनतळ करण्याचे कामास मान्यता देणेबाबत मुख्याधिकारी, शिर्डी यांनी माहिती दिली. गर्दीचे नियोजन करण्याचे अनुषंगाने करण्यात येणारे वाहनतळ व रस्त्याचे रुंदीकरण (लेन) बाबत मा.अध्यक्ष महोदयांनी विचारणा केली. याबाबत मुख्याधिकारी, शिर्डी यांनी वाहनतळ त्याचा क्रम आणि रस्त्याचे रुंदीकरणबाबत माहिती दिली. तथापी गर्दीचे नियोजन करतांना आवश्यक वाहनतळ, मंदिरापासुन / मध्यापासुन येतांना वाहनतळांचे नियोजन-क्रम, रस्त्यांची रुंदी, नकाशा व अनुषंगीक पुरेसी माहिती उपलब्ध न झाल्याने सदर विषय पुढील बैठकीत फेरसादर करण्याचे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.७:- अति महत्वाच्या व्यक्तीसाठी अंजनेरी ता.त्र्यंबकेश्वर जि.नाशिक येथे ३ हेलीपॅड व विश्रांती कक्षाचे बांधकामास प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत..**

अति महत्वाच्या व्यक्तीसाठी अंजनेरी ता.त्र्यंबकेश्वर जि.नाशिक येथे ३ हेलीपॅड व विश्रांती कक्षाचे बांधकाम करणेबाबत त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या आगामी सिंहस्थ कुंभमेळया कालावधीत मोठया प्रमाणात भक्तांची वर्दळ, गर्दी होणार आहे. सदर वेळी अतिमहत्वाचे व्यक्तीही कुंभमेळा कालावधीत त्र्यंबकेश्वर येथे येणार आहेत. त्यासाठी गर्दीचे नियोजन, वेळेचा अपव्यय व प्रशासनाची अडचण विचारात घेता सदर बाब महत्वाची व आवश्यक असलेबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी सागितले. मा.अध्यक्ष महोदयांनी सदर जागेवर 3 हेलीपॅड हे कायमस्वरुपी आहेत की तात्पुरते आहेत, हेलीपॅडजवळ अनुकूल वातावरण आणि विश्रामगृहाची लांबी-रुंदी किती आहे व त्याचे आवश्यकतेबाबत

विचारणा केली. यावर कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी १ हेलीपॅड कायमस्वरुपी व उर्वरीत २ हे तात्पुरत्या कालावधीसाठी करण्यात येणार असल्याचे सांगितले. पोलीस अधिक्षक (ग्रामीण) व अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी संयुक्त पाहणी करुन हेलीकॅप्टर उतरण्यासाठी अनुकूल वातावरण असलेले व तात्काळ जाणे-येणे सोईचे होईल अशा योग्य जागेची पडताळणी करावी व पुढील बैठकीत प्रस्ताव फेरसादर करावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.८:- श्री.क्षेत्र त्र्यंबकेश्वर उपसा योजनेसाठी सौर उर्जा पॅनेलची तजविज करणेबाबत प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत..**

श्री.क्षेत्र त्र्यंबकेश्वर उपसा योजनेसाठी सौर उर्जा प्रकल्पाची तजविज करणेबाबत प्रस्तावाविषयची माहिती अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग यांनी सांगितली. सदर सौरउर्जा प्रकल्पासाठी एकुण ८ एकर जागेची आवश्यक असल्याचे प्रस्तावात नमूद करण्यात आले आहे. सदर प्रकल्पासाठी लागणाऱ्या जागेचे भूसंपादन व जागा निश्चिती करण्यात आली आहे काय याबाबत मा.अध्यक्ष, महोदयांनी विचारणा केली. यावर प्रस्तावासाठी आवश्यक असलेली जमिनी निश्चित करण्यात आलेली नसल्याचे व प्रकल्पासाठी भूसंपादनाची रक्कम गृहीत धरलेली नसल्याचे अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग यांनी सांगितले. यावर प्रथमत: सदर प्रकल्पासाठी लागणारी जागा ही जिल्हाधिकारी नाशिक व मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.नाशिक यांनी माफक दरात उपलब्ध करुन देण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी असे मा.अध्यक्ष, महोदयांनी सुचित केले. तसेच सदर प्रकल्प उभारण्यासाठी येणाऱ्या खर्चापैकी त्र्यंबकेश्वर मंदिर संस्थाननेही खर्च उचलणेबाबत मुख्याधिकारी, त्र्यंबकेश्वर यांनी चर्चा करावी. असे मा.अध्यक्ष महोदयांनी निर्देश दिलेत. अधीक्षक अभियंता म.रा.वि.वि.कं. यांनी सदर प्रकल्पाची जागा नियोजित स्थळी उपलबध न झाल्यास सौर प्रकल्पातुन उत्पादित होणारी विज समायोजित करण्याबाबत साशंकता उपस्थित केली. यावर कुंभमेळा आयुक्त यांनी ग्रीन ओपन ॲक्सेस नियम या धोरणाची पडताळणी करणेबाबत अधीक्षक अभियंता म.रा.वि.वि.कं. यांना निर्देश दिलेत. अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग व अधीक्षक अभियंता म.रा.वि.वि.कं. यांनी सौरप्रकल्पाबाबत स्वतंत्र बैठक घेऊन सर्व आवश्यक बाबी तपासुन सुधारित प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.९:- श्री.क्षेत्र सप्तश्रृंगी गड येथे नविन बसस्थानक बांधण्याचे कामास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत..**

श्रीक्षेत्र सप्तश्रृंगी गड येथे रा.प.नविन बसस्थानक बांधण्याचे कामास मंजुरी देणेबाबत विभाग नियंत्रक, म.रा.मार्ग परिवहन महामंडळ नाशिक यांनी सुचित केले. सदर प्रकल्पासाठी वन विभागाची जागा निश्चित करण्यात आलेली असुन सदर जागेवर तळमजला, (बसस्थानक इमारत व फलाट), पहिला मजला (चालक / वाहक विश्रांती गृह), वाहनतळ कॉंक्रिटीकरण आणि आरसीसी कुंपनभिंत या बाबींचा समावेश असल्याचे नमूद केले. याबाबत मा.अध्यक्ष महोदयांनी सदर बांधकाम उत्कृष्ठ प्रतीचे करावे व पर्यावरण पुरक आणि सुसंगत असावे असे नमूद करुन सदर रु.१५ कोटीचे कामास सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.१०:- विकास कामे करतांना संबंधीत विभागाने ना-हरकत दाखला (NOC) मुदतीत देणेबाबत..**

सिंहस्थ कुंभमेळा सन २०२७-२८ च्या अनुषंगाने विविध कार्यालयाकडून अनेक कामे प्रस्तावित आहे. प्रस्तावित कामे करतांना इतर कार्यालयाकडून नाहरकत दाखल्याची आवश्यकता असते. नाहरकत दाखल्या देण्याची कार्यवाही मुदतीत म्हणजेच मागणी केल्यापासुन आठ दिवसांत करणेबाबत व सिंहस्थ कुंभमेळा सन २०२७-२८ हा कालबध्द (Time Bond) कार्यक्रम असल्याने शिघ्र गतीने करणेबाबत आवश्यक चर्चा झाली. नाहरकत दाखला देण्याची बाब ही संबंधीत विभागांची असुन त्यांनी प्रथम प्राधान्याने करणे अभिप्रेत आहे. तथापी यात विलंब होत असेल तर ही बाब निश्चितच योग्य नाही असे मा.अध्यक्ष महोदयांनी नमूद केले. तरी याबाबत आवश्यकतेनुसार माहिती घेण्यात येईल व वेळप्रसंगी बैठक आयोजित करण्यात येऊन नियमोचित कारवाई करण्यात येईल असे सर्वानुमते ठरले.

उपरोक्त प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामांपैकी जी कामे शासनाचे पत्र दिनांक २९/०८/२०२५ मध्ये नमुद नाही आणि / किंवा रू.५१४०.०१ च्या मान्यतेच्या पलीकडे आहे त्या सर्व कामांबाबत नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण अधिनियम २०२५ मधील तरतुदीनुसार शासनाची मान्यता घ्यावी लागेल. त्यानुसार सदर प्रस्ताव हे शासनाकडे शिखर समितीकडे कार्योत्तर मंजुरीसाठी प्रस्तावित करण्यात यावे असे मा.अध्यक्ष, महोदयांनी निर्देशीत केले.

कुंभमेळा आयुक्त यांनी सर्वांचे आभार व्यक्त करून बैठक समाप्त करण्यात आली.

Digitally signed by
Praveen Nilkanthrao Gedam
Date: 27-01-2026 14:39:40

**(डॉ. प्रवीण गेडाम)**
**अध्यक्ष, नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा**
**विभागीय आयुक्त, नाशिक**